


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड-महाराष्ट्र | शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३७ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com




# मंत्रिमंडळात मोठे फेरबदल ?

## अर्थ खात्यासाठी भाजप-राष्ट्रवादीत चढाओढ; बावनकुळेंचे महसूल खाते जाणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुती सरकारमधील तीनही पक्षांच्या वाट्याला आलेल्या मंत्रिपदांमध्ये अदलाबदल होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. अर्थ खाते मिळवण्यासाठी दोन पक्षांमध्ये रस्सीखेच होऊ शकते. राष्ट्रवादीला अर्थ खात्यावर पाणी सोडावे लागलेच तरमहसूल खात्यासाठी आग्रह धरला जाऊ शकतो. त्यामुळे या चढाओढीत कोणत्या मंत्र्यांचा तोटा होऊ शकतो याची चर्चा सध्या रंगली आहे. काही मंत्र्यांकडील



खाती ही काढली जाऊ शकतात. तर काही मंत्र्यांना बदलण्याची चर्चाही दबक्या आवाजात सध्या सुरू आहे. एका वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार, अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र राज्याचा अर्थसंकल्प कोण मांडणार हा प्रश्न महायुतीसमोर उभा ठाकला होता. अशावेळी फडणवीसांनी अर्थ खात्याचा भार आणि अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारीही सांभाळली. आता याच अर्थखात्यावरून महायुतीतमधील मंत्रिमंडळात मोठे बदल होण्याची शक्यता वाढली आहे. अजित पवारांनंतर अर्थखाते ▶▶ उर्वरित पान २ वर

**● बावनकुळेंना सोडावे लागणार महसूल खाते ?**

**भाजपकडून महसूल खात्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना आपल्या खात्यावर पाणी सोडण्याची वेळ येऊ शकते. मुख्यमंत्री फडणवीस स्वत:कडे अर्थ खाते कायम ठेवतील. बदल्यात राष्ट्रवादीला चंद्रशेखर बावनकुळेंचे महसूल खाते दिले जाईल. बावनकुळेंचा सन्मान राखण्यासाठी त्यांना फडणीसांकडचे ऊर्जा खाते दिले जाऊ शकते. बावनकुळेंनी यापूर्वीदेखील ऊर्जा खात्याचा पदभार सांभाळल्यामुळे तो अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. याशिवाय शिवसेनेच्या सामाजिक न्याय आणि पर्यटन खात्यांचे मंत्रीही बदलले जाऊ शकतात. त्यामुळे मंत्री संजय शिरसाट सामाजिक न्याय खाते आणि मंत्री शंभूराज देसाईंकडच्या पर्यटन खात्याची जबाबदारी इतर कुणाकडे सोपवली जाऊ शकते.**







# एनसीआरटीच्या पुस्तकात मराठा साम्राज्याचा नकाशा चुकीचा

## खा.बजरंग सोनवणे यांचे केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना पत्र; नकाशात बदल करून ऐतिहासिक सत्याची मोडतोड थांबवण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

एनसीआरटीच्या इयत्ता ८ वीच्या इतिहास पुस्तकात मराठा साम्राज्याच्या नकाशात करण्यात आलेले बदल अत्यंत गंभीर असून, हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा आणि देशाच्या गौरवशाली इतिहासाचा अवमान आहे. हा चुकीचा नकाशा तत्काळ दुरुस्त करून ऐतिहासिकदृष्ट्या अचूक नकाशा प्रसिद्ध करावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहले आहे. खा.सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे,



छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेले मराठा साम्राज्य हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णकाळ आहे. पेशव्यांच्या काळात या साम्राज्याचा विस्तार भारतीय उपखंडातील विस्तीर्ण भागापर्यंत झाला होता. अटकेपार झेंडे फडकवणाऱ्या मराठ्यांच्या शौर्याचा इतिहास जगजाहीर आहे. मात्र, एनसीआरटीच्या नवीन पुस्तकात मराठा साम्राज्याचा विस्तार आणि प्रभाव अत्यंत कमी करून दाखवण्यात आला आहे. हा प्रकार इतिहासाची मोडतोड करणारा आणि सत्याचा अपलाप करणारा आहे. इतिहासाच्या पुस्तकातील या चुकीच्या बदलामुळे महाराष्ट्र राज्यात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ऐतिहासिक तथ्यांशी ▶▶ उर्वरित पान २ वर

**● मराठा साम्राज्याचा विस्तार हा केवळ भौगोलिक नव्हता, तर तो आमच्या अस्मितेचा विषय आहे. एनसीआरटीसारख्या जबाबदार संस्थेने चुकीचा नकाशा देऊन इतिहासाशी अन्याय करू नये. शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन दुरुस्तीचे आदेश द्यावेत, अन्यथा हा विषय अधिक तीव्रतेने मांडला जाईल. -खा.बजरंग सोनवणे, लोकसभा सदस्य, बीड**

# घाटसावळीमध्ये दुर्दैवी घटना : पाच वर्षीय चिमुकल्याचा साप चावल्याने मृत्यू


**घाटसावळी । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील घाटसावळी येथे अतिशय हृदयद्रावक घटना घडली असून, एका पाच वर्षीय चिमुकल्याचा साप चावल्याने मृत्यू झाला आहे. गोरक्ष मारुती लांडे (वय ५ वर्षे) असे मृत मुलाचे नाव असून, ही घटना रात्री अंदाजे एकच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, घराच्या अंगणात झोपलेला असताना अचानक सापाने चावा घेतला. घटनेनंतर कुटुंबीयांनी तातडीने मुलाला



वाचविण्यासाठी प्रयत्न केले, मात्र योग्य वेळी वैद्यकीय उपचार मिळू न शकल्यामुळे या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे लांडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. गावातील नागरिकांनी या घटनेबद्दल तीव्र हळहळ व्यक्त केली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सापांचे प्रमाण वाढत असल्याने अशा घटना घडत असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, ▶▶ उर्वरित पान २ वर

# धोंडराईवर शोककळा; तरुण वैभव गुंजाळ याचे अपघाती निधन



**गेवराई । प्रतिनिधी**

येथील प्रतिष्ठित नागरिक श्री. भारत मामा गुंजाळ यांचा तरुण मुलगा वैभव भारत गुंजाळ याचे आज अपघाती निधन झाले. या दुर्दैवी घटनेने धोंडराई गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वैभवचा अपघात अत्यंत भीषण होता, ज्यामध्ये त्याला आपले प्राण गमवावे लागले. एक उमदा, मनमिळावू आणि कष्टाळू तरुण म्हणून वैभवची गावात ओळख होती. ऐन उमेदीच्या काळात काळाने त्याच्यावर झडप घातल्याने गुंजाळ परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या निधनाने एका हसत्या खेळत्या कुटुंबाचा आधार हिरावला गेल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.वैभवच्या पश्चात त्याचे आई-वडील, भावंडे आणि मोठा आप्तपरिवार आहे. या कठीण प्रसंगातून सावरण्याची आणि हे अतीव दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर त्याच्या कुटुंबीयांना देवो, अशी प्रार्थना सर्वत्र केली जात आहे. वैभव भारत गुंजाळ याच्या पार्थिवावर दि. २४ एप्रिल रोजी रात्री ९:३० वाजता धोंडराई येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले आहे

# गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट; दहाव्याच्या विधीवेळी जाधव कुटुंबाचा संसार आगीत भस्मसात



**अंबाजोगाई:। प्रतिनिधी**

तालुक्यातील पट्टीवडगाव येथे आज सकाळी साडे नऊच्या सुमारास गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली असून यात दोन घरे आणि संपूर्ण संसार जळून खाक झाला आहे. बालासाहेब जाधव यांच्या पत्नीच्या निधनानंतर आयोजित दहाव्याच्या विधीसाठी स्वयंपाक सुरू असताना अचानक लागलेल्या आगीमुळे हा अनर्थ ओढवला. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, पट्टीवडगाव येथील रहिवासी बालासाहेब जाधव यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# बेमुदत संपाचा चौथा दिवस; तरीही शासन अद्याप स्तब्धच!

## बीड जिल्हयात राज्य कर्मचाऱ्यांचा संपाला उत्स्फुर्त प्रतिसाद

### बीड जिल्हयातील शासकिय कार्यलये ओस; आरोग्य सेवाही ठप्प!





**बीड । प्रतिनिधी**

जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्टे असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसह विधानसभेच्या पटलावर मान्य केलेल्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी २१ एप्रिल, २०२६ पुकारलेला बेमुदत संप अद्याप सुरूच आहे. संपाचा काल चौथा दिवस असतानाही शासन अद्याप स्तब्धच आहे. त्यामुळे सरकार जोपर्यंत न्याय मागण्या मान्य करीत नाही तोपर्यंत संप चालूच ठेवण्याचा निर्धार राज्य समन्वय समितीने केला आहे. या संपास बीड जिल्हयात चौथ्या दिवशीही उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना बीड यांनी पाठिबां देवुन संपात १०० टक्के सहभाग घेवुन यशस्वी केलेला आहे. जिल्ह्यातील सर्व शासकिय कार्यालये कालही ओस पडलेली तर आरोग्य सेवा ठप्प झालेली आहे. मा जिल्हाधिकारी कार्यालया समोर सर्व कर्मचारी यांनी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजे पर्यंत धरणे आंदोलन करण्यात आले. परिचारिका संघटनेने जिल्हा रूग्णालयासमोर, पोलीस कर्मचारी संघटनेने पोलीस अधीक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड च्या गटशिक्षणाधिकारी पदी भगवान सोनवणे तर उपशिक्षणाधिकारी म्हणून धनंजय शिंदे यांची नियुक्ती



**बीड । प्रतिनिधी**

जल्हा तांत्रिक सेवेमधील विस्ताराधिकारी या संवर्गातून शिक्षण सेवा गट ब प्रशासन शाखा मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरूपातआज दि. २४ एप्रिल २०२५ रोजी आदेश निर्गमित झाले आहेत. बीडच्या गटशिक्षणाधिकारी पदावर भगवान सोनवणे यांची तर उपशिक्षणाधिकारी म्हणून धनंजय शिंदे यांची निवड झाली आहे. १) धनंजय मारुतीराव बोंदार्डे (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड जिल्हा अहिल्यानगर ) २)भगवान सोपानराव सोनवणे (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती बीड) ३) रंगनाथ नामदेव राऊत (विभागीय सहाय्यक सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात रोजगार हमी योजना मनरेगाची १ लाख ४० हजारांपेक्षा अधिक कामे अपूर्ण

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात रोजगार हमी योजना (मनरेगाची) जवळपास १ लाख ४० हजारांपेक्षा अधिक कामे अपूर्णच नव्या नियमांनुसार ही कामे होणार की तशीच रद्द होणार याबद्दल कसलीही माहिती सध्या मिळत नाही. जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर जवळपास १ लाख ४० हजार ६२८ कामे अपूर्ण आहेत. यात ८ हजार ३८३ पाणंद रस्ते, २ हजार ६६१ सार्वजनिक वृक्ष लागवड, २९ हजार १०४ वैयक्तिक विहिरी, ३ हजार ५०० शेततळे, ११ हजार ९२१ गायगोठे, ५४ हजार घरकुले, १ हजार १२६ फळबागा व इतर २ हजार ४२६ कामांचा समावेश आहे... एवढ्या मोठ्या प्रमाणात कामे प्रलंबित असताना अद्याप अनेक तालुक्यांमध्ये मागण्या सुरू नाहीत, मस्टर भरले जात नाहीत, मध्येच संप, सॉफ्टवेअर अडचणी, वेगवेगळ्या चौकश्या, अहवाल यांच्यामुळे सर्व काही




बंद असते. अनेक शेतकऱ्यांनी योजना पूर्ण करून घेतल्या तरी त्यांना अद्याप एक रुपयांचं अनुदान शासन स्तरावरून देण्यात आलेले नाही.. त्यांनी मंजुरीपासून बिलासाठी फायली दाखल करण्यापर्यंत टक्केवारीने एकूण अनुदानाच्या ३० ते ४०% पैसे वाटले आहेत आणि काम देखील केलेलं आहे अशा गायगोठा, विहिरी, घरकुल बांधून झाले आहे त्या लाभार्थ्यांना त्यांचे रोहयो कुशल, अकुशल मिळालेले नाही..

**● गावोगावचे सरपंच, उपसरपंच, गावकारभार चालविणाऱ्या पुढाऱ्यांना उत्तरे द्यावी लागत आहेत ज्यांची माहिती त्यांना देखील नाही.. १.५ लाख लाभार्थी अद्याप शांत आहेत मात्र त्यांच्यातील असंतोष उफाळून आल्यास याचा परिणाम सर्वांना भोगावा लागणार आहे.**



# इस्रायली सैनिकाकडून येशू ख्रिस्ताचा पुतळा उद्ध्वस्त

इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारी नेतान्याहू यांना आपल्या सैनिकाच्या कृत्याबद्दल माफी मागावी लागली. या सैनिकाने लेबनॉनमधील कारवाईत येशू ख्रिस्ताचा पुतळा पाडला आणि फोडला. एखाद्याच्या पुतळ्याची भीती कोणास का वाटावी वा त्याचा संताप का वाटावा हा प्रश्न. वास्तविक पुतळा ज्याचा असतो त्याचा त्या उभारणीत काहीही वाटा नसतो. कोणीही सज्जन स्वत:च स्वत:चा पुतळा उभारत नाही. म्हणजे याही प्रकरणात ज्याचा पुतळा उभा केला गेला त्या येशूचा त्यात काहीही संबंध नाही. असे असताना तो पाडून, फोडण्यामागील कारण काय? जिवंत असतानाही येशूने हसत मरण स्वीकारले असे मानले जाते. तेव्हा त्याच्या पुतळ्याकडून तो फोडणाऱ्या विरोध होण्याची शक्यता शून्य. पुतळे, मूर्ती यात ईश्वरीय तत्त्व आहे / असते असे श्रद्धाळू मानत असले तरी म्हणून या मूर्ती, पुतळे नश्वर नसतात असे अजिबात नाही. इतिहास असा मूर्तिभंजकाच्या कृत्याने खच्चून भरलेला आहे. जे इतिहासात सर्रास झाले तेच कृत्य वर्तमानात इस्रायली सैनिकाने केले. या पुतळा-फोड्या इस्रायली सैनिकाचा धर्म कोणता होता हे प्रसिद्ध झालेले नाही. पण हे करणारा इस्रायली सैनिक होता हे लक्षात घेता तो यहुदी नसण्याची शक्यता फार कमी. त्याच्या या कृत्याचा समाजमाध्यमी बभ्रा झाल्यावर नरसंहारी पंतप्रधान नेतान्याहू यांना ही घटना मान्य करावी लागली आणि कॅमेऱ्यातच ती चित्रित झालेली असल्याने तीबद्दल 'धक्का बसल्याची' भावना व्यक्त करून दिलगिरी वगैरे त्यांना व्यक्त करावी लागली. या घटनेची वाच्यता अजिबात झाली नसती तर या नरसंहारी नेत्याने माफी मागितली असती काय, हा प्रश्न आता विचारणे अनुचित ठरेल. पंतप्रधान नरसंहारी आणि त्याच्या आज्ञा पाळणारे पुतळा-संहारी असेही जे झाले त्यावरून काहींस वाटेल. या वैयक्तिक भाव-भावनांकडे दुर्लक्ष करून जे झाले त्यामागील इतिहास लक्षात घेणे समयोचित ठरावे.

कारण कोणत्याही घटनेमागे हजारो वर्षांची सांस्कृतिक कारणे असतात. ही घटना त्यास अपवाद ठरू शकत नाही. इस्रायली सैनिकाकडून जे झाले त्याच्या मुळाशी येशू ख्रिस्ताच्या अस्तित्वापासूनचा धर्मसंघर्ष आहे. ख्रिस्ती धर्मग्रंथ असलेल्या बायबलपर्यंत त्याचा संदर्भ आढळेल. आज अनेकांस माहीत नसावे; पण ख्रिस्ती धर्माची स्थापना करणारा 'परमेश्वर-पुत्र' येशू हाच मुळात धर्माने यहुदी मानला जातो. तत्कालीन रोमन सम्राटाचे आणि त्याचे मतभेद झाले. म्हणून मुळात झाल. म्हणून अलीकडे आपल्या देशात कुख्यात झालेल्या 'राजद्रोह' (सेडिशन) या गुन्ह्याखाली रोमन सम्राटाने येशूस देहान्त प्रायश्चित्त ठोठावले. त्यानंतर यहुदींनीच त्यास रोमन अधिकाऱ्याहाती सुपूर्द केले हा इतिहास. तेव्हापासून ख्रिश्चन धर्माभिमानी हे यहुदींकडे ख्रिस्ताचे मारेकरी या भावनेतून पाहतात. त्यामुळे ख्रिश्चन जगात इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर यहुदींच्या विरोधात मोठमोठ्या मोहिमा चालवल्या गेल्या. 'क्रुसेड्स' या धर्मलांच्छित नावाने ओळखल्या जाणाऱ्या इस्लामविरोधी मोहिमांत आणि





त्यानंतर कित्येक वर्षांत यहुदींचे शिरकाण झाले ते यामुळेच. अत्यंत रक्तरंजित अशा या मोहिमा हाईनलँड (आताची जर्मनी), फ्रान्स इत्यादी युरोपीय देशांत चालवल्या गेल्या. त्यांत 'परमेश्वरविरोधी' ठरवून यहुदींचे नृशंस शिरकाण झाले. अशा प्रत्येक मोहिमांतून ख्रिश्चन आणि यहुदी यांच्यातील परस्परविरोधी भावना अधिकाधिक तीव्र होत गेली. अजूनही ती पूर्ण दूर झालेली आहे असे नव्हे. या काळात ख्रिश्चनांत येशूच्या हत्येसाठी सर्वच यहुदींस जबाबदार धरण्याची प्रवृत्ती इतकी वाढीस लागली की १९६०च्या दशकात ख्रिस्ती धर्मसंस्थेचे प्रमुख पोप यांना या संदर्भात आवाहन करावे लागले आणि सर्वच यहुदींस वैरी मानू नका, असे सांगावे लागले. हा इतिहास लक्षात घेतल्यास ही परस्परविरोधाची भावना सर्वच यहुदी आणि सर्वच ख्रिस्ती धर्मीयांच्या मनातून दूर झाली असे मानणे अगदीच भाबडेपणाचे ठरेल. या अशा वैरभावना मनाच्या तळातून दूर व्हाव्यात यासाठी उभय धर्मीयांत एक समंजस, सुसंस्कारी प्रौढता असावी लागते. असेल तर ती वर्तनातून दिसून यावी लागते. तसे झाल्यास परस्परांच्या मनांतील एकमेकांविषयीचे शत्रुत्व कमी होऊ शकते आणि कालांतराने ते कायमचे दूर होते. फारच कमी यहुदी नेत्यांच्या ठायी असा प्रौढपणा असल्याचे इतिहास दर्शवतो. स्वत: स मुसलमानी आक्रमकांचे बळी ठरवत छाती पिटत आक्रोश करताना इतरांचा बळी घेत राहण्याचे आगळे कौशल्य इस्रायली धुरीणांनी नेहमीच दर्शवले. त्यामुळे धार्मिक सहिष्णुता असलेले इस्रायली नेते सापडणे अवघड आणि त्यामुळे ही सहिष्णुता समाजात आढळणे त्याहून अवघड. इस्रायलचे माजी पंतप्रधान यिझ्झॅक रॅबिन यांनी असा समंजसपणा दर्शवत सामंजस्याचे धोरण अवलंबिण्याचा प्रयत्न केला. पण महात्मा गांधी ज्याप्रमाणे मुसलमानांसाठी मवाळ ठरवून हिंदुत्ववाद्याकडून मारले गेले त्याप्रमाणे यिझ्झॅक रॅबिन यांचीही धर्मबांधवाकडून मायदेशातच हत्या झाली. कोणत्याही असंस्कृत, अप्रगत आणि म्हणून असहिष्णु समाजात प्रतिस्पर्धी धर्मांविषयी आगलावी विधाने करणारे, माथेफिरू लोकप्रिय होतात. इस्रायल हे त्याचे धगधगते उदाहरण. आताही गाझादी प्रांतांत बेधुंद नरसंहार सुरू आहे तो याच धर्मभावनेतून. इस्रायली सूडामागे इस्लामी अतिरेकी धर्मवाद्यांच्या हमास संघटनेने घडवलेले यहुदी हत्याकांड असल्याचे सांगितले जाते. पण हे केवळ निमित्त. ते नसते मिळाले तर अन्य कोणत्या ना कोणत्या कारणाने इस्रायलने गाझातील असहायांस संपवण्याची संधी शोधलीच असती. लेबनॉनमध्ये यहुदी सैनिकांनी ख्रिस्ती धर्मसंस्थापकांचा अपमान केला. इस्रायलचे माजी सर्वोच्च नेता एरियल शेरॉन यांनी जेरुसलेम येथील मशिदीत घुसून इस्लामचे प्रेषित महंमद यांचाही असाच अपमान केला होता, हा इतिहास फार जुना नाही. त्यानंतर दुसरा 'इन्तिफादा' उसळला आणि इस्रायलमध्ये दहशतवादी हल्ल्यांची लाट आली. सुदैवाने आता तसे काही होण्याची शक्यता नाही. एक तर इस्लामी धर्ममार्तंडांच्या तुलनेत ख्रिस्ती धर्मीय मवाळ आहेत आणि सांप्रत काळी खुद्द पोप लिओ हेच इराणविरोधातील अमेरिकी- इस्रायली युद्ध थांबवावे या मताचे आहेत. हे पोप अमेरिकेचे. पण तरी त्यांनी अमेरिकेचेच अध्यक्ष, स्वत:स ख्रिस्ती धर्मानुयायी मानणारे डोनाल्ड ट्रम्प यांना युद्धखोरीसाठी खडसावण्यास कमी केलेले नाही. तथापि अशी प्रौढता यहुदी धर्मीय नेतृत्वाकडून अपेक्षित नाही. धर्माचे कारण पुढे करत सतत युद्धजन्य अवस्थेत राहणे हे इस्रायली नेतृत्वाचे वैशिष्ट्य राहिलेले आहे. हे इस्रायली नेते परधर्मीयांविरोधात नेहमीच 'अँटी-सेमिटिझम'ची आवई उठवतात आणि स्वधर्माविरोधातील कपोलकल्पित संकटाचे निमित्त पुढे करत अन्य धर्मीयांचे शिरकाण करत राहतात. हे फक्त अन्य धर्मीयांबाबतच होते असे नाही. आपल्या देशातील जातिव्यवस्थेप्रमाणे इस्रायलमध्येही वेगळी वर्णव्यवस्था आहे. जगातील यहुदींना 'पवित्र भूमी'त (द होली लँड) येऊन स्वतंत्र देश वसवण्याची हाक थिओडोर हर्शेल आदी प्रभृतींनी दिली खरी. पण त्या आवाहनास जागून जगभरातील यहुदी तेथे आल्यावर सर्व यहुदींसाठी सर्व काही समान होते वा आहे असे नव्हे. ऑस्ट्रियन, हंगेरीयन वा पोलिश यहुदींस मिळणारी वागणूक, त्यांचे समाजातील स्थान आणि आफ्रिकी वा आशियाई यहुदी यांत किती समानता आहे हे सर्व जाणतात. तेव्हा जे काही झाले त्यामागे इतका दीर्घ इतिहास आहे. तो बदलायचा असेल तर युरोपातील जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, इंग्लंड आदी देशांनी ज्याप्रमाणे इस्रायलचा कांगावा ओळखून आपल्या धोरणात बदल केला, त्याप्रमाणे इतरांनाही- विशेषत: अमेरिकेस- इस्रायल हाताळणीत बदल करावाच लागेल. गावातील धनाढ्याच्या पोराच्या वाह्यात वर्तनाकडे किती दुर्लक्ष करायचे यालाही मर्यादा असतात. त्या देशांच्या वर्तनासही लागू होतात. यहुदींना यातना भोगाव्या लागल्या हे मान्य; पण यथार्थदर्शनाची वैचारिक परंपरा या यातनांनाही लागू करणे योग्य.

◆ पान १ वरून पुढे...

## मंत्रिमंडळात मोठे....

भाजपकडे गेले. पण हे खाते भाजपकडे कायमस्वरुपी राहावे म्हणून प्रयत्न सुरू आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादीच्या नेत्यांनीही अर्थखाते सोडायची तयारी दाखवून बदल्यात महसूल खाते मागितल्याची चर्चा आहे. दरम्यान मंत्रिमंडळात बदल घडवण्याच्या चर्चेवरून विरोधी गटातून सडकून टीका केली जात आहे. मलाईदार खाते कुणाला मिळावे यासाठी महायुतीमधील पक्षांची रस्सीखेच सुरू असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे. दुसरीकडे खातेवाटपाची चढाओढ राष्ट्रवादीसोबतच्या संबंधांमध्ये कटुता आणणार नाही याचीदेखील काळजी फडणवीसांना घ्यायची आहे. मात्र, भाजप आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी ही चर्चा फेटाळली आहे.

## एनसीआरटीच्या पुस्तकात....

छेडछाड करून नव्या पिढीसमोर चुकीचा इतिहास मांडला जात असल्याची भावना जनसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. या विषयावर राज्यभरातून संताप व्यक्त होत असतानाच खा. सोनवणे यांनी थेट केंद्राकडे धाव घेत या प्रकरणाची दखल घेण्यास भाग पाडले आहे. एनसीआरटीने या नकाशात बदल का केला, याचे अधिकृत आणि स्पष्टीकरण सरकारने द्यावे, ऐतिहासिकदृष्ट्या योग्य आणि प्रमाणिक नकाशा पुन्हा पुस्तकात समाविष्ट करण्यात यावा, मराठा साम्राज्याचा गौरवशाली इतिहास कमी लेखण्याचा प्रयत्न थांबवावा आदि मागण्याही करण्यात आल्या आहेत.

## घाटसावळीमध्ये दुर्दैवी....

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, गावात साप पकडणाऱ्या पथकाची व्यवस्था करावी तसेच साप चावल्यास त्वरित काय करावे याबाबत जनजागृती करावी, अशी मागणी होत आहे. ही घटना परिसरासाठी धक्कादायक ठरली असून, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## गॅस सिलेंडरचा....

पत्नी पार्वतीबाई जाधव यांचे १२ एप्रिल २०२६ रोजी कर्करोगामुळे निधन झाले होते. त्यांच्या निधनानंतरच्या दहाव्याच्या विधीसाठी जाधव यांच्या घरी आज सकाळपासूनच स्वयंपाकाची लगबग सुरू होती. विधीसाठी आलेल्या पाहुण्यांच्या भोजनाची तयारी सुरू असताना सकाळी ९:३० च्या सुमारास स्वयंपाकाच्या भट्ट्याने अचानक पेट घेतला. उपस्थितांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीची झळ बसताच भट्ट्याला जोडलेल्या गॅस सिलेंडरचा मोठा स्फोट झाला. हा स्फोट इतका भीषण होता की त्याचा आवाज संपूर्ण परिसरात ऐकू आला आणि परिसरात एकच खळबळ उडाली. जाधव यांचे घर जुन्या पद्धतीचे आणि लाकडी बांधकामाचे असल्याने आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केले. ही आग इतकी वेगाने पसरली की तिने शेजारील दुसऱ्या घरालाही आपल्या कवेत घेतले. ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाण्याचा मारा करून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, या भीषण आगीत दोन्ही घरातील धान्य, कपडे, भांडी आणि महत्त्वाची कागदपत्रे जळून कोळसा झाली आहेत. पत्नी गमावल्याच्या शोकात असलेल्या जाधव कुटुंबाचा राहता संसार डोळ्यादेखत उघड्यावर पडल्याने संपूर्ण गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. या दुर्घटनेमुळे कुटुंबाचे मोठे आर्थिक आणि मानसिक नुकसान झाले आहे. महसूल प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने घटनास्थळाचा पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त कुटुंबाला शासनाकडून तातडीची आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी आग्रही मागणी पट्टीवडगावच्या ग्रामस्थांनी केली आहे.

## बेमुदत संपाचा...

कार्यालयासमोर, प्रत्येक तालुक्यात तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. सर्व आंदोलनात परिसर 'एकच मिशन जुनी पेंन्शन' सह इतर घोषणांनी दणाणून गेले. याबाबत समन्वय समितीने दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, पेंन्शनसाठी मार्च २०२३ मधे सात दिवसांचा अभूतपूर्व संप राज्यातील १७ लाख कर्मचारी शिक्षकांनी घडवून आणला. परिणामी जुन्या पेंन्शन योजने प्रमाणे कर्मचाऱ्याच्या 'सामाजिक' व 'आर्थिक' सुरक्षा देणारी 'पेन्शन योजना' लागू करण्याचे राज्य सरकारने मान्य केले. त्यासाठी सुबोधकुमार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. या समितीचा अहवाल स्वीकारून पेंन्शन लागू करण्यासाठी पुनश्च १४ डिसेंबर २०२३ रोजी संप करावा लागला तेंव्हा अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचे आश्वासन सरकारने दिले. परंतु त्याबाबत सरकारकडून चालढकल सुरू होती, त्यामुळे २९ ऑगस्ट पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय समन्वय समितीने घेतला तेंव्हा कुठे जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना स्वीकारण्यात आली. या योजनेच्या नियम, अटी नंतर लागू करण्याचे अभिवचन देण्यात आले. परंतु ते अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. त्याप्रमाणे रिक्त जागा भराव्यात, ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त अंशत: अनुदानित शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांना १०-२०-३० अशा तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, विनाअनुदानित वा अंशत; अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे, १० वर्षे सतत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्यात या व इतर मागण्यांसाठी होत असलेल्या या संपात जिल्ह्यातील सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने संपात सहभागी झाले आहेत. समन्वय समितीचे अध्यक्ष बाबा बडे, सरचिटणीस रामचंद्र ठोसर, निमंत्रक राजकुमार कदम, गजानन जाधव, परमेश्वर राख, राजेंद्र खेडकर, एस. पी. जगताप, महादेव चौरे यांचे सह महेश काळे, पुरूषोत्तम आंधळे, विकास मुळे, डी. डी. खामकर, श्रीमती शिला मुंडे, राहुल धोंगडे, राजेंद्र औचरमल, डी. जी. तांदळे, राजकुमार साठे, संदीप धस, कालिदास धपाटे, गणेश आजबे, दत्तात्रय चव्हाण, बाळासाहेब शिंदे, वैभव बेदरे, श्रीमती रेखा बांगर, रामराव फड, मंगेश सुरवसे, किशोर बिरलिंगे, योगेश कुलकर्णी, अरबाज पठाण, शब्बीर पठाण, राम पांचाळ, महेश सातपुते, एस. आर. बागुल, नवनाथ आनेराव, श्रीमती वंदना विघ्ने, श्रीमती गोदावरी नागरगोजे, श्रीमती हेमलता परचाके, श्रीमती राजश्री आचार्य, श्रीमती पुष्पा चक्रे यांनी केलेले होते. त्यास बीड जिल्हयातील सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रचंड प्रतिसाद देवुन बेमुदत संपात सहभाग नोंदविलेला आहे.

## बीड च्या गटशिक्षणाधिकारी ....

व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ लातूर) ४) धनंजय रामराव शिंदे (उपशिक्षणाधिकारी शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद बीड) ५)ऋषिकेश जनार्दन शेळके (अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक माध्यमिक हिंगोली ) ६)मोहन त्रिंबक काकडे उपशिक्षणाधिकारी शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद कोल्हापूर ७)नानाभाऊ गणपती हजारे उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सातारा ८) हनुमान गहिनीनाथ गव्हाणे उपशिक्षणाधिकारी शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद जळगाव ९)श्रीमती हिना उमर अंसारी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती परळी १० बाबासाहेब उजगरे उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सांगली ११)श्रीमती प्रणिता पंडितराव कापसे उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद गोंदिया १२ खान समंदर हमीद खान उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली.१३-राहुल भट्टी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वडवणी १४-संजय शिंदालकर उपशिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग जिल्हा परिषद बीड. सदर पदोन्नत्या माननीय सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याची का २८३०६/ २० १७ च्या आदीन राहून पदोन्नतीच्या कोट्यतील सर्व रिक्त पदे२५.५.२००४ च्या सेवा जेष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात स्वरूपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या ७.५. २००२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनानुसार देण्यात येत आहेत .संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त अधिकाऱ्यास पदोन्नती या ठिकाणी रुजू होण्याकरिता तात्काळ कार्यमुक्त करण्याची कारवाई करावी तसेच संबंधित अधिकारी यांनी पदोन्नती आदेश निर्गम झाल्याच्या दिनांक पासून ३० दिवसाच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे व संबंधित अधिकारी व रु जाचा अहवाल आयुक्त शिक्षण यांना सादर करावा असे आदेश महाराष्ट्र शासनाचे उपसचिव मो.बा. तहसीलदार यांनी आज दिनांक २४एप्रिल २०२४ रोजी २६ रोजी निर्गमित केले आहेत. बीड जिल्हा परिषद मधील पदोन्नती पात्र सर्व उपशिक्षणाधिकारी गट शिक्षण अधिकारी यांचे यांचे अभिनंदन महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष गौतम चोपडे तुकाराम पवार ठाकूर ,जी एन भोरे ,कांचन गायकवाड ,बांगर शिवाजी प्रल्हाद जावळे ,डीजे तांदळे यांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## समाधान शिबिरास....

महसूल विभागातील व इतर विभागातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . नेकनुर महसूल मंडळातील सर्व गावांचे उपसरपंच, पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, महसूल सेवक, महावितरण कर्मचारी , आरोग्य विभाग कर्मचारी , अंगणवाडी पर्यवेक्षिका , अंगणवाडी सेविका , आशा कार्यकर्त्या , शेतकरी गट , विद्यार्थी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले . नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले . भूमी अभिलेख अधिकारी व कर्मचारी यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांची स्वतंत्र नोंद घेतली. या शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांचे माहितीपर स्टॉल्स उभारण्यात आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , वारस नोंद , डिजिटल सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले . शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा , मयत खातेदार कमी करणे , वर्ग दोन चे वर्ग एक मध्ये रूपांतर , वारस फेरफार , पाणी नोंद , नोंदणी प्रक्रिया , वसुली पावत्या , सेवा मित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी , केवायसी प्रक्रिया , आधार शिबिर , लाभ योजना माहिती , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी , गायरान मंजुरी आदेश तसेच शेततळे योजनांची माहिती देण्यात आली . याशिवाय डिजिटल सातबारा उताऱ्यांचे वाटप , विविध योजनांतील प्रमाणपत्रांचे वितरण तसेच मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली . संजय गांधी निराधार योजना व श्रवणबाळ योजना लाभार्थ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या . लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला . प्रास्ताविक करताना नायब तहसीलदार जाधवर यांनी नमूद केले की , गावकऱ्यांपर्यंत जाऊन आम्ही सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत . यामुळे गोरगरीब लाभार्थी यांना निश्चितच लाभ होईल . तसेच त्यांनी नमूद केले की बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीडला नियुक्ती झाल्यापासूनच अशा प्रकारच्या योजना सुरू केल्या होत्या . त्याचाही लाभ जनतेला मोठ्या प्रमाणात मिळालेला आहे . एकंदरीत रित्या या शिबिरास नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे या शिबिराचे फलित बघायला मिळाले .

## बीड शहरासाठी....

त्वरित दुरुस्त करून सेवा सुरू करण्याच्या सूचना दिल्या. नगरपालिका प्रशासनानेही या सूचनेला सकारात्मक प्रतिसाद देत दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेतले आहे. तसेच, बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पालकमंत्री सुनेत्राताई पवार आमदार विजय सिंह पंडित, यांच्या मार्गदर्शनात नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक, तसेच नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब भाई हे सर्व लोकप्रतिनिधी कटिबद्ध असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. यावेळी नगरसेवक शेख माज्जेद, स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव साहेब, तसेच कर्मचारी पप्पू साळवे व जावेद खान आदी सर्व कर्मचारी उपस्थित होते. लवकरच ही शववाहिका अत्याधुनिक सुविधांसह सज्ज होऊन बीड शहरातील नागरिकांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या निर्णयामुळे शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, गरजूंना मोठा दिलासा मिळणार आहे.

## सरकारी शाळा....

सांगत सहकारी शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष रोडे, मोहन शिंदे, बाबासाहेब भोंडवे, भगवान शिंदे, मच्छींद्र राख सर, जयराम बांगर सर, विजय नागरगोजे सर , मळेकर सर, नजान सर, जनार्धन वनवे सर जालींदर बेदरे सर ,बाबासाहेब सानप सर, भागवत बांगर सर, तात्या भोंडवे, गोल्हार सर, गोपालघरे सर, बाळासाहेब जगताप तसेच तालुक्यातील तांबा राजुरी, डोमरी, नायगाव केंद्रातील सर्व शिक्षक-शिक्षिका व गावातील महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डोमरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री दिलीप खाडे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन बाबासाहेब सानप यांनी मांडले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापनाने विशेष परिश्रम घेतले.

## बीड येथे आंबेडकरी....

परिषदेमध्ये विशेषतः मातंग समाजावर पडत असलेल्या विविध वैचारिक प्रभावांचा आढावा घेत, समाजाला फुले,शाहू,आंबेडकर विचारसरणीच्या अधिष्ठानावर एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. समाजातील तरुण पिढीने शिक्षण, संघटन व संघर्ष या तत्वांवर पुढे येत नेतृत्व घ्यावे, यासाठीही प्रेरणादायी मार्गदर्शन केले जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. या परिषदेसाठी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून आठवले गटाचे राज्य युवक अध्यक्ष पप्पूजी कागदे, डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भैया चांदणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लहुजी क्रांती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विकास पाथरीकर असणार असून डॉ. मिलिंद आवाड यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या मान्यवरांच्या मार्गदर्शनातून समाजाच्या विविध प्रश्नांवर दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. परिषदेच्या माध्यमातून समाजातील ऐक्य बळकट करण्यासोबतच सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमान यासाठी ठोस भूमिका निश्चित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विविध स्तरांवरील कार्यकर्ते, युवक व समाजातील मान्यवर यांच्यात संवाद साधून संघटन मजबूत करण्यावरही भर दिला जाणार आहे. या परिषदेस बीड जिल्ह्यातील आंबेडकरी मातंग समाजातील सर्व नागरिक, कार्यकर्ते व मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बाबुराव गालफाडे, कल्याण ताकतोडे, प्रताप मोरे यांच्यासह आयोजकांनी केले आहे.

## आंबेडकरांनी संविधानाच्या....

घाटसावळी पारगाव (सिरस) या गावी केले. पुढे बोलताना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी हिंदू कोड बिल मंजूर करून त्यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिले. अशिक्षित समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू केले. एक व्यक्ती एक मताचा अधिकार देऊन मतदार राजा बनविले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग असा भेदभाव न करता सर्व भारतीयांना सक्षम लोकशाही बहाल केली. यावेळी किसन तांगडे, श्रीकांत नवले, सुभाष तांगडे, शाम वीर, विष्णू जोगदंड, मुन्ना फड, बाळू भालेराव, राजेंद्र भालेराव, दादासाहेब लांडे, भैय्या भालेराव, विनोद तांगडे, कपिल तांगडे, प्रदीप तांगडे यांच्यासह शेकडो आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जनगणना 2027 प्रशिक्षणाला वेग : वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी; प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

आगामी जनगणना २०२७ प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यात प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षणाला वेग आला असून २४ एप्रिल रोजी आयोजित प्रशिक्षण सत्रात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन प्रशिक्षणाची पाहणी केली व प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले .नगर रोड परिसरातील प्रशिक्षण केंद्रात आयोजित सत्रामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शिवकुमार स्वामी तसेच उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा जनगणना अधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणाची प्रगती तपासली . यावेळी त्यांनी वर्गात प्रत्यक्ष बसून प्रशिक्षणाची पद्धत , विषय मांडणी व प्रात्यक्षिके यांचा आढावा घेतला . प्रशिक्षण अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सुरू



असून प्रगणक व पर्यवेक्षक एकाग्रतेने मार्गदर्शन ऐकत आहेत . डिजिटल सादरीकरण , फळ्यावरचे प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष संवाद या माध्यमातून प्रशिक्षण दिले जात आहे . प्रशिक्षणार्थींनीही विविध प्रश्न विचारत सक्रिय सहभाग नोंदवला.यावेळी शिवकुमार स्वामी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की , जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे . प्रत्येक प्रगणकाने आपली जबाबदारी समजून अचूक व पारदर्शक माहिती संकलित करावी . नागरिकांशी विश्वासपूर्वक संवाद साधणे ही यशस्वी जनगणनेची गुरुकिल्ली आहे . तसेच शैलेश सूर्यवंशी यांनी सांगितले की , प्रशिक्षण काळात प्रत्येक बाब सखोल समजून घेणे आवश्यक आहे . जनगणना ही केवळ आकडे गोळा करण्याची प्रक्रिया नसून प्रशासनाच्या नियोजनाचा पाया आहे .

त्यामुळे अचूकता , वेळेचे नियोजन आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रशिक्षणामध्ये घरांची माहिती , कुटुंब रचना , मूलभूत सुविधा , तांत्रिक साधनांचा वापर तसेच डिजिटल पद्धतीने माहिती नोंदविणे या बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे . प्रत्यक्ष उदाहरणे व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रक्रिया समजावून सांगितली जात आहे .एकूणच , बीड जिल्ह्यात जनगणना २०२७ साठी प्रशासनाने भक्कम तयारी केली असून प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रगणक व पर्यवेक्षक सक्षम बनवले जात आहेत. या प्रक्रियेमुळे आगामी जनगणना अधिक प्रभावी , अचूक आणि पारदर्शक होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे .

## एलसीबी चे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक शिवाजीराव बंटेवाड साहेब यांनी गाईचे प्राण वाचवल्याबद्दल त्यांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये कायदा व व्यवस्था सुव्यवस्था अबाधित ठेवण्यात यश मिळवलेले इंटेलिजन्स पोलीस निरीक्षक शिवाजीराव बंटी वाड साहेब यांच्या उत्कृष्ट पोलीस प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत सध्या बीड जिल्ह्यातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे त्यांनी काही दिवसांपूर्वी ११ गाई कत्तल खाण्यासाठी जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळताच त्यांनी आपल्या टीमच्या माध्यमातून अतिशय उत्कृष्ट कारवाई करून संबंधित गाय असलेले वाहन ताब्यात घेऊन त्या गाईची सुटका करून



संबंधित व्यक्तीवर कायद्यानुसार कारवाई करून त्या गाई सुखरूप पणे गोशाळेमध्ये पाठवून दिल्या म्हणून बीड जिल्ह्यातील तमाम गोभक्तामध्ये सध्या आनंदाचे वातावरण पाहायला मिळत असल्यामुळे याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने व श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन च्या वतीने आज प्रत्यक्ष बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेमध्ये जाऊन त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी तथा सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील व व उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्वा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब तसेच बीड जिल्हा लोकशाही पत्रकार संघाचे संघटक तथा दैनिक न्याय टाइम से वर्तमानपत्राचे तालुका प्रतिनिधी संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह वरिल मान्यवरांनी मा श्री शिवाजीराव बंटेवाड साहेबांच्या उल्लेखनीय पोलीस प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत समाधान व्यक्त करून त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील कार्यास मनस्वी शुभेच्छा दिल्या.

## फिर्यादी अरबाज जब्बार शेख यास गंभीर मारहान केल्या प्रकरणी आरोपी फहिम रहिमोद्दीन शेख व इतरांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

**बीड । प्रतिनिधी**

मौजे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथील फिर्यादी नामे अरबाज जब्बार शेख हे दिनांक २०.०३.२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वा. सुमारास कुटूंबासह राजगल्ली गेवराई येथे स्कुटीवरुन प्रवास करीत असतांना अचानक स्विफ्ट कार क्र. चH- 22-U-2233 ही अचानक रिव्हर्स आली, त्यामुळे स्कुटीचे नुकसान झाले म्हणुन कार मालक फहिम रहिमोद्दीन यास गाडी व्यवस्थीत चालव असे म्हणताच फहिम रहिमोद्दीन याने गाडीतील लोखंडी तांबी घेऊन फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. फहिम याचे घर तेथेच असल्याने त्याचे



नातेवाईक जावेद हमीदराज शेख, नवीज जावेदराज शेख, अजीम रहिमोद्दीन शेख, उबेद नय्युम शेख, नय्युम रहिमोद्दीन शेख हे सर्वजण आले. या सर्वांनी फिर्यादी व त्याची पत्नी यांना लोखंडी गज, फायटरने जबर मारहान केली व लाथाबुक्क्याने, चापटाने मारहान केली म्हणुन फिर्यादीने वरील आरोपीविरुध्द गु.र.नं. १८४ / २०२६, कलम ११८ (२), ११५ ( २ ) ३५१ (२), ३५१ (३), ३५२, २८१, ३२४(२),१८९(२), १९१ (२), १९१ (३) व १९० बी. एन. एस. प्रमाणे गुन्हा दाखल केला.

वरील गुन्ह्यातील आरोपी १) फहिम रहिमोद्दीन शेख, २) जावेद हमीदराज शेख, ३) नवीज जावेदराज शेख, ४) अजीम रहिमोद्दीन शेख, ५) उबेद नय्युम शेख व ६) नय्युम रहिमोद्दीन शेख यांनी जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे त्यांचे विधिज्ञामार्फत अटकपूर्वक जामीनचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर सरकार पक्षाकडुन सरकारी वकील ॲड.ए.डी.राख यांनी युक्तीवाद केला. तसेच फिर्यादीचे वतीने ॲड. पुष्पा अभिजित कदम यांनी मा.न्यायालयात भक्कमपणे बाजु मांडल्याने फिर्यादी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन वरील आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला.

सदर प्रकरणामध्ये फिर्यादीचे वतीने बीड येथील प्रसिध्द विधिज्ञ ॲड. पुष्पा कदम यांनी काम पाहिले, त्यांना याकामी ॲड. अभिजित कदम यांनी मोलाचे सहकार्य केले. या प्रकरणाकडे गेवराई शहरातील विशेषतः राजगल्ली, गेवराई येथील नागरीकांचे लक्ष लागुन होते.

## आदित्य इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची चार्जिंग स्टेशनला भेट

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदित्य एज्युकेशन ग्रुप संचलित आदित्य इंजिनिअरिंग कॉलेजच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. इमामपूर रोडवरील ई-व्हीकल चार्जिंग स्टेशनला भेट देऊन विद्यार्थ्यांनी बॅटरी चार्जिंग तंत्रज्ञान आणि ई-बसच्या कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या भेटीमुळे विद्यार्थांच्या पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाली. विद्यार्थ्यांनी भविष्यातील 'इलेक्ट्रिक क्रांती चा अनुभव घेतला. ई-बसचे



तंत्रज्ञान,बॅटरी चार्जिंग आणि एसी सिस्टीमची प्रत्यक्ष माहिती घेतली. ही औद्योगिक भेट आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी संपन्न झाली. द्वितीय, तृतीय आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या भेटीत सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी चार्जिंग स्टेशनचे डेपो मॅनेजर बाळू जगताप यांनी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक वाहनांची कार्यप्रणाली, चार्जिंग प्रक्रिया आणि बॅटरी सिस्टीमची सविस्तर माहिती दिली. विशेषतः ई-बसमध्ये वापरले जाणारे एसी कूलिंग तंत्रज्ञान आणि ऊर्जा बचतीची पद्धत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरणांद्वारे समजावून सांगण्यात आली. ही भेट यशस्वी करण्यासाठी आदित्य शिक्षण

## श्री सिद्धिविनायक आयुर्वेद व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचा उपक्रम; २५५ बालकांना सुवर्णप्राशनचा लाभ

**बीड । प्रतिनिधी**

येथील श्री सिद्धिविनायक आयुर्वेदिक चिकित्सालय आणि रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत सुवर्णप्राशन शिबिराला पालकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. गुरुपुष्यामृत योगाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात शहरांतील एकूण २५५ बालकांना सुवर्णप्राशनाचा डोस देण्यात आला.

या विशेष शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय आयुर्वेद गुरू वैद्य शिवप्रसाद चरखा, नगरसेवक श्री. शुभम धूत, रोटरी अध्यक्ष इंजि. राहुल बोरा, प्रकल्प प्रमुख डॉ. वरद



चरखा आणि सौ. विशाखा ढोले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे इतर सदस्यही मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुवर्णप्राशन हे आयुर्वेदातील 'जातकर्म संस्कारा'चा एक भाग असून, मुलांची रोगप्रतिकारशक्ती आणि बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी ते अत्यंत प्रभावी मानले जाते. महर्षी काश्यप यांनी सांगितलेल्या अडीच हजार वर्षांच्या परंपरेला आधुनिक विज्ञानाचीही जोड मिळाली असून, संशोधनाअंती सुवर्णप्राशनाचे मुलांच्या वाढीवरील सकारात्मक परिणाम सिद्ध झाले आहेत. या उपक्रमाबद्दल बोलताना डॉ. वरद चरखा यांनी सांगितले की, रोटरीच्या 'माता व बाल आरोग्य' या जागतिक मोहिमेअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला आहे. शुद्ध सुवर्णभस्म आणि मेध्य औषधींपासून तयार केलेले हे सुवर्णप्राशन मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एक नैसर्गिक कवच ठरेल. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. सीमा, डॉ. शमिका, डॉ. आरती, डॉ. दिपाली आणि चिकित्सालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आणि पालकांनी 'सिद्धिविनायक चिकित्सालय' व 'रोटरी क्लब'च्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले आहे.

## ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाचे बीड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत

**माजलगाव । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खा. समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडेवाडा येथे सुरु केलेल्या पहिल्या मुलीच्या शाळेच्या भिडेवाडा चित्ररथाचे बीड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले.

शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे या चित्ररथाचे आगमन झाले.



याप्रसंगी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे आणि शहराध्यक्ष नितीन राऊत यांनी सदरील 'भिडेवाडा - भारतातील पहिली मुलींची शाळा या चित्ररथाचे आगमन झाल्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी करत स्वागत केले. याप्रसंगी परीट समाजाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष ड. संदीप बेदरे, ओबीसी मुस्लिम ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा. रफिक बागवान, युवा नेते नितीन धांडे, माळी महासंघाचे प्रा. लक्ष्मण गुंजाळ, बीड बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, मंगेश जमदाडे, रंजित सोन्नर, अजिंक्य सुरवसे, स्वप्नील शिंदे, सावता काळे, अजय राऊत, शरद विटकर, महेश वेवहारे, नामदेव मेत्रे, वैभव खेत्रे, ज्ञानेश्वर राऊत, सुशील चौधरी, शिवम बोराडे, स्वप्नील यादव, शुभम आखाडे यांच्यासह समता सैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ यांच्या पुढाकारातून व समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खा. समीरभाऊ भुजबळ व आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या संकल्पनेतून भिडेवाडा - भारतातील पहिली मुलींची शाळा या ऐतिहासिक वारशाचा संदेश प्रत्येक गावापर्यंत पोहोचवण्याचे अतिशय प्रेरणादायी कार्य सुरू आहे. हा रथ म्हणजे केवळ एक प्रतिकृती नाही, तर शिक्षण, समता आणि सामाजिक जागृतीचा दीप आहे. मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी लढा दिला, त्या महान कार्याची आठवण करून देणारा जिवंत प्रेरणा स्तोत्र आहे. या पार्श्वभूमीवर बीड शहरात शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता या चित्ररथाचे आगमन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झाले. यावेळी चित्ररथाचे भव्य स्वागत करण्यात आले.

## लोकनेते सुंदररावजी सोळंके साखर कारखान्याच्या उसतोड व वाहतूक करार प्रक्रियेस प्रारंभ

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या आगामी हंगाम २०२६-२७ गळीत हंगामासाठी उस तोडणी व वाहतूक यंत्रणेच्या करार प्रक्रियेचा शुभारंभ दि.१९ एप्रिल, २०२६ रोजी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर उत्साहात करण्यात आला. संचालक आबासाहेबजी गायकवाड,कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला.

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा आगामी सन २०२६ड़२७ च्या ऊस गळीत हंगामाचा ऊसतोड व वाहतुक कराराचा शुभारंभ अक्षयतृतीयाच्या शुभमुहूर्तावर करण्यात आला. यावेळी कार्यकारी संचालक आर. सी. बडगुजर यांनी सांगितले की, जेष्ठ संचालक तथा माजी मंत्री आ. प्रकाशदादा सोळंके,जेष्ठ मार्गदर्शक धैर्यशील काका सोळंके, चेअरमन श्री. विरेंद्र सोळंके, व्हा. चेअरमन जयसिंग सोळंके व संचालक



मंडळाच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळीचे हंगाम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत. यंदाच्या हंगामासाठी कार्यक्षेत्रातील सुमारे १२६१७ हेक्टर क्षेत्रावर उस पिक उभे असून,त्याची नोंद कारखान्याकडे झाली आहे.

कारखान्याने या हंगामासाठी १० लाख मे.टन उस गळीताचे उद्दिष्ट ठेवले आहे. तोडणी वाहतूक व्यवस्थेसाठी सुमारे २०० ट्रक/ ट्रॅक्टर, १०० मिनी ट्रॅक्टर, ३५० बैलगाड्या आणि ३५ आधुनिक उस तोडणी यंत्रे यांचे करार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच मशीनरी दुरुस्ती व ओव्हरहॉलिंगची कामेही वेगाने पूर्ण करण्यात येत आहेत. करार प्रक्रिया पूर्ण होताच डव्हान्स वाटप करून सक्षम यंत्रणा उभी करण्यात येणार आहे.ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कारखाना काम करत असून कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ठेकेदारांनी ऊस तोडणी वाहतुकीचे करार करावेत.असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास ग्री मॅनेजर देशमुख,ऊस पुरवठा अधिकारी बी. ई. भोसले, वगरे बी. ए., उस विकास अधिकारी श्री. स्वामी ए. टी. यांच्यासह सर्व शेतकरी उपस्थित होते.

## लेक्रॉसच्या जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन केले आहे. लेक्रॉस ऑलिम्पिक खेळ असून २०२८ मध्ये होणार्या ऑलम्पिक मध्ये खेळला जाणार आहे. नुकतेच लेक्रॉसला खेळाडूंना दिले जाणारे शासकीय व निवास शासकीय नोकरीमध्ये ५% आरक्षणामध्ये समावेश करण्यात आला आहे. या खेळाच्या परभणी-सेलू येथे लेक्रॉस सीनियर गटाच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा होणार आहेत. त्यासाठी बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशनच्या वतीने तेलगाव नाका येथील (टब) मैदानावर लॅक्रोस या खेळाच्या जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणी मधून निवड झालेला संघ परभणी येथे होणार्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल अधिक माहितीसाठी बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशन सचिव रामदास गिरी यांच्याशी संपर्क ९८८१५९६०७ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र
▸▸ शनिवार दि. २५ एप्रिल २०२६


## अनुसुचित जातीच्या प्रवर्गातील घटकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**बीडः** आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय पुणे यांच्या वतीने महाराष्ट्रातील अनुसुचित जातीच्या प्रवर्गातील घटकांना लाभ देण्यासाठी, समाज कल्याण विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहितीसाठी कार्यशाळेचे आयोजन. दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी. ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकिय विश्रामगृह समोर, नगर रोड बीड येथे करण्यात आले आहे. मातंग समाजातील बीड जिल्हातील लाभार्थींनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे असे आवाहन प्रदीप भोगले सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी , व जिल्हा व्यवस्थापक,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. बीड यांनी केले आहे.

# समाधान शिबिरास नेकनुर मध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

## नागरिकांना विविध सेवांचा गावातच लाभ देण्याचा जिल्हाधिकारी यांचा निर्धार

## अनेक विभागाच्या सेवा एकाच ठिकाणी लाभ घ्यावा : तहसीलदार शेळके

**बीड । प्रतिनिधी**

शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज अभियान अंतर्गत मंडळ विभाग नेकनुर अंतर्गत नेकनुर येथे २४ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर आयोजित करण्यात आले . या शिबिरास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली. नेकनुर परिसर येथील माऊली मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , विद्यार्थी , ग्रामस्थ तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .



राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने हे अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव स्वतः अनेक ठिकाणी हजेरी लावत असतात . नेकनुर येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्ष स्वरूप दिल्याचे चित्र पाहायला मिळाले . या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास बीडचे नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांची प्रमुख उपस्थिती लाभली . कार्यक्रमाच्या वेळी, नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर ,मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे, ग्राम महसूल अधिकारी शरद इथापे , ग्राम महसूल अधिकारी सर्वेश कांबळे ,ग्राम महसूल अधिकारी स्वाती ग्राम महसूल अधिकारी कमलेश निर्मळ,मुंजाळ, यांची उपस्थिती होती ,शिबिराचे महत्त्व व उद्देश याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले . सदर कार्यक्रमास नेकनुर येथील सरपंच , उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य सामाजिक कार्यकर्ते हजर होते . कार्यक्रमावेळी उपसरपंच, व युवा नेते जिया भाई शेख यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करून सदर शिबीर चा सर्वांनी लाभ घेणे बाबत आवाहन केले . तसेच कार्यक्रमास महसूल मंडळातील आजी, माजी सरपंच तसेच ▸▸ उर्वरित पान २ वर

# बीड शहरासाठी शववाहिका दुरुस्त करून लवकरच सेवेत: शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. बीड नगरपालिका प्रशासन व स्वच्छता व आरोग्य सभापती निजाम शेख यांच्या सूचनेवरून शहरातील बंद पडलेली शववाहिका दुरुस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, लवकरच ती नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शहरात आपत्कालीन परिस्थितीत किंवा दुःखद प्रसंगी शववाहिकेची अत्यंत गरज भासते. मात्र, मागील काही काळापासून तांत्रिक बिघाडामुळे ही



सेवा खंडित झाली होती. त्यामुळे नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता, ज्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन स्वच्छता व आरोग्य सभापती निजाम शेख यांनी तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना शववाहिका ▸▸ उर्वरित पान २ वर

### ● नागरिकांच्या सेवेसाठी कटिबद्ध

**निजाम शेख यांनी सांगितले की, बीड शहरातील नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी नगरपालिका प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. शववाहिका सेवा लवकरात लवकर सुरू करून नागरिकांना दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. शहराच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.**

# सरकारी शाळा टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची : ॲड. प्रकाश कवठेकर

## श्रीमती छाया मुरलीधर भोंडवे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

डोमरी केंद्र अंतर्गत तिरमलवाडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये कार्यरत असलेल्या श्रीमती छाया मुरलीधर भोंडवे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला गावातील नागरिक, शिक्षकवर्ग व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच श्रीमती मंदा विठ्ठल जगताप होत्या. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदचे माजी




सदस्य ॲड. प्रकाशदादा कवठेकर, भाजपाचे गणप्रमुख राजेभाऊ भोंडवे, माजी उपसरपंच दादाराव जगताप तसेच माजी पतसंस्था अध्यक्ष नागरगोजे सर उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. प्रकाशदादा कवठेकर म्हणाले की, सरकारी शाळा टिकवण्याची जबाबदारी केवळ शिक्षकांची नसून समाजातील प्रत्येक घटकाची आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांनी श्रीमती भोंडवे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते श्रीमती छाया भोंडवे यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या मनोगतात श्रीमती भोंडवे यांनी सेवाकाळातील अनुभव ▸▸ उर्वरित पान २ वर

# वादळी वाऱ्यामुळे सौर ऊर्जा प्रकल्पांचे मोठे नुकसान

## वांगी येथील बालासाहेब बाबासाहेब शेळके याशेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड ; मदतीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे वांगी येथील बालासाहेब बाबासाहेब शेळके यांच्या शेतात व वांगी, शिवणी, काटोडा परिसरात गुरुवार, दि. २२ एप्रिल. रोजी झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे सौर ऊर्जा पॅनलच्या साहित्यांचे मोठे नुकसान झाले असून, याचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे.



अचानक आलेल्या वादळामुळे अनेक ठिकाणी सोलर पॅनेल उखडून पडले आहे. काही ठिकाणी पॅनेल तुटल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी उभारलेल्या सौर पंप आणि लहान सौर प्रकल्पांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वाऱ्याचा वेग जास्त असल्यामुळे पॅनेलचे स्टैंड वाकले, तर काही ठिकाणी संपूर्ण संरचना कोसळल्याची माहिती मिळत आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. एकीकडे उन्हाळ्याच्या तोंडावर पाण्याची गरज वाढत असताना सौर पंप बंद पडल्याने सिंचनावर परिणाम होत आहे. दुसरीकडे दुरुस्तीचा खर्च परवडत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची गरज आहे.

# बीड येथे आंबेडकरी मातंग समाज परिषदेचे आयोजन; सामाजिक-राजकीय प्रश्नांवर होणार सखोल मंथन

### ● डॉ. मिलिंद आवाड यांची उपस्थिती राहणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

बहुजन क्रांती मोर्चा व लसाकम यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे आंबेडकरी मातंग समाज परिषदेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी नगर येथील अस्मिता फंक्शन हॉलमध्ये ही परिषद पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या परिषदेकडे जिल्ह्यातील आंबेडकरी मातंग समाजाचे लक्ष लागले असून मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या परिषदेमध्ये बीड जिल्ह्यातील आंबेडकरी मातंग समाजाचे फुले, शाहू,आंबेडकर यांच्या चळवळीतले ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित करण्यात येणार आहे. तसेच सध्याची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, समाजासमोरील विविध प्रश्न आणि येणाऱ्या काळातील आव्हाने यावर सखोल विचारमंथन होणार आहे. बदलत्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात मातंग समाजाची भूमिका काय असावी, यावरही मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ▸▸ उर्वरित पान २ वर



# आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीयांना लोकशाही बहाल केली:पप्पू कागदे

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशभरात होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी लढा उभारुन शोषित, पीडित, उपेक्षित, समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व उपेक्षितांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मिती करून प्रत्येकांना स्वातंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला.हजारो वर्षाची गुलामगिरी नष्ट करून उपेक्षितांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधान देशाला अर्पण करून लोकशाही बहाल केली. असे प्रतिपादन युवा प्रदेश अध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंती प्रसंगी ▸▸ उर्वरित पान २ वर



# रस्त्याचे काम रखडले स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आंदोलनाचा इशारा



**तलवाडा। प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हजरत टेपु सुल्तान चौक मार्गे गंगावाडी फाट्या पर्यंतच्या सिमेंट व डांबरी रस्त्याचे काम मंजुर होऊन जवळपास दोन ते तीन वर्षाचा कालावधी ऊलटुन जाऊन देखील हे आजुन देखील खोदकामाच्या पुढे सरकत नसल्याने आणेक दुचाकी स्वार व पाई चालणारे वयोवृद्ध या ठिकाणी कोलमडल्याची घटना आणेक वेळा समोर आल्याने वाहन धारक व वाटसरुंची होणारी गैरसोय लक्षात घेऊन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व त्यांच्या सहकार्यांनी मुख्य कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांना निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की काही महिन्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज चौक थे पुरातन समाधी स्थळ टेपु सुल्तान चोका पर्यंत रस्त्याचे खोदकाम केले आहे पण अद्यापही रस्त्याचे काम सुरू न केल्यामुळे आम्ही रस्ता रोको आंदोलन करणार आहोत याची आपण दक्षता घ्यावी निवेदनात पुढे म्हटले आहे की छत्रपती शिवाजी महाराज चौक तलवाडा ते गंगावाडी फाटा या दरम्यानच्या रस्त्याचे काम मंजूर होऊन तब्बल दोन ते अडीच वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी लक्ष देऊन पाहणी केली की नाही ? याकडे कामावर असलेले अभियंता यांनी डोळेझाक केली का? असे अनेक प्रश्न तलवाडा आणि या रस्त्यावरील वारना-या वाटसरु नागरिक कडून उपस्थित होत असून सदर रस्त्याचे काम तात्काळ सुरू न केल्यास दिनांक १/५/२००२६ वार शनिवार रोजी सकाळी १०:३० वाजता तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे, या निवेदनावर शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगणे, बाळू डहाळे, सुनिता भाभी गिल यांच्या स्वाक्ष-या आहे.